


# हॅलो प्रभात

नवे विचार...नवी सुरुवात

RNI NO. MAHMAR/2020/79996

▪ संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

▪ मुंबई ▪ पुणे ▪ सांगली ▪ कोल्हापूर ▪ सातारा ▪ सोलापूर ▪ अहिल्यानगर

सांगली-कोल्हापूर

▪ वर्ष : ०६ ▪ अंक : २७१ ▪ रविवार, ०४ जानेवारी २०२६ ▪ किंमत : ३ रुपये ▪ पाने : ४


## संक्षिप्त...

### पोलीस ठाण्यातच पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण

**सोलापूर : हॅलो प्रभात**

टेंभुर्णी पोलिस ठाण्यात कर्तव्यावर असलेले पोलिस कर्मचारी पोकॉ महेंद्र शेटे (वय २९) यांना तीन जणांनी गच्ची पकडून दगड, काठी व लाथा-बुक्क्यांनी जबर मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना आलेगाव बु. जवळ घडली. याप्रकरणी रविंद्र चंदनकर, रामचंद्र चंदनकर व रामचंद्र चंदनकर यांचा जावई (अनोळखी) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

### ज्यादा पाणी आवक तरी वीजनिर्मिती कमीच

**सातारा : हॅलो प्रभात**

कोयना धरणांतर्गत जलाशयात यावर्षी मे महिन्यापासूनच पावसाला सुरुवात झाली. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी कमी पाऊस झाला असला तरी तुलनात्मक ज्यादा पाण्याची आवक व मुबलक पाणीसाठा असल्याची समाधानकारक परिस्थिती आहे. गतवर्षीच्या तुलनेत आतापर्यंत तब्बल ५०.९८६ दशलक्ष युनिट कमी वीजनिर्मिती झाली आहे.

### भाविकांच्या वाढत्या गर्दीने देवस्थानसमोर सुरक्षेचे आव्हान

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

करवीर निवासिनी अंबाबाई मंदिरात दररोज तसेच शनिवार-रविवार, सण-उत्सव आणि सुट्ट्यांच्या काळात प्रचंड प्रमाणात भाविकांची गर्दी होत आहे. वाढत्या गर्दीमुळे परिस्थिती हाताळणे ही मोठी आव्हाने देवस्थान व प्रशासनासमोर उभी राहिली आहेत.

### नऊ दिवसांत २३ कोटी २९ लाखांची देणगी

**राहाता : हॅलो प्रभात**

नाताळ सुट्टी ते सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाचे स्वागत करण्याच्या कालावधीतील ९ दिवसात, देशविदेशातील सुमारे ८ लाखावर साईभक्तांनी श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले तर या कालावधीत सुमारे २३ कोटी २९ लाख रुपयांची रुपये देणगी प्राप्त झाल्याची माहिती संस्थानचे गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.

# अजितदादांना 'महायुती'त घेतल्याचा पश्चाताप!

## फडणवीसांना सांगायचो,थोडा विचार करा : रवींद्र चव्हाण ; दमात आणि हलक्यात घेऊ नका : चंद्रकांत पाटील

**मुंबई/सांगली : हॅलो प्रभात**

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या 'महायुती' तील समावेशाबद्दल थेट आपली भूमिका मांडली आहे. अजित पवारांना

महायुतीत घेताना थोडा विचार करा, असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला होता. आता, अजित पवारांच्या काही वक्तव्यांवरून त्यांना पश्चाताप होत असल्याचे चव्हाण यांनी सूचित केले आहे. दरम्यान, मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनीदेखील अजित पवारांवर तोंड सुख घेतले आहे.

चव्हाण यांनी अजित पवारांच्या ७० हजार कोटींच्या कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून आणि 'मी सत्तेत आहे' या त्यांच्या वक्तव्यावर टीका केली. अजितदादांना 'महायुती' मध्ये घेतल्याबद्दल आता पश्चाताप होत आहे, असेही चव्हाण म्हणाले.

### अजितदादांना आत्मपरीक्षणाचा सल्ला

गुन्हा सिद्ध होण्याआधी कोणी दोषी असतो का, या अजित पवारांच्या प्रश्नाला उत्तर देताना, 'आम्ही बोलायला लागलो, तर अजित पवारांची अडचण होईल', असे चव्हाण म्हणाले. 'अजितदादा, आपल्या गिरेबानात झाक के देखीए' असे म्हणत त्यांनी पवारांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला





दिला. प्रदेशाध्यक्ष म्हणून कार्यकर्ते रोज आपली व्यथा मांडतात, असेही चव्हाण यांनी नमूद केले. या प्रकरणात चंद्रशेखर बावनकुळे यांनीही अजित पवारांनी असे बोलायला नको होते, असे म्हटले आहे.

### अजितदादांचे भाजपावर भ्रष्टाचाराचे आरोप

राज्यात मुख्यमंत्री फडणवीसांच्या मांडीला मांडी लावून सत्तेत बसलेल्या अजित पवारांनी पिंपरी-चिंचवडमध्ये बोलताना भाजपावर सडकून टीका केलेली आहे. अजित पवारांनी भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप केले आहेत. त्यामुळे आता भाजपा चे नेतेही अजित पवारांच्या आरोपांना आणि टीकेला उत्तर देताना पाहायला मिळत आहेत.

### चंद्रकांतदादाही सटकले !

अशातच आता सांगलीतील प्रचारसभेत बोलताना मंत्री चंद्रकांत पाटील यांनी अजित पवारांनी गंभीर इशारा दिला आहे. ते म्हणाले की 'ये घरला जायचयं का असं म्हणाऱ्यांना मी असं म्हणेन की, दमात घेऊ नका आणि हलक्यात पण घेऊ नका, मुख्यमंत्री पण आणि गृहमंत्री पण आमच्याकडे आहेत. विकासावर निवडणूक न्यायची आहे, युतीतील पक्षांनी एकमेकांवर बिलकुल टीका करायची नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे.

### अजित पवारांचे भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप

अजित पवार यांनी पिंपरी-चिंचवडमध्ये बोलताना भाजपवर आरोप करताना म्हटले की, 'माझ्यावर सत्तर हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा आरोप होता, पण तो सिद्ध झाला का तर नाही.

ज्यांनी माझ्यावर आरोप केले त्यांच्यासोबत मी सत्तेत आहे. भाजपा ने पुण्यात कोट्यवधी रुपयांच्या ठेवी मोडल्या, हा एक भ्रष्टाचारच आहे. त्या भ्रष्टाचाराचे पुरावे माझ्याकडे आहेत' यावरून आता राजकारण तापले आहे.

# शहरात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

**सांगली : हॅलो प्रभात**

शहरातील व्यंकटेश नगर परिसरात संध्याकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास एका भटक्या कुत्र्याने केलेल्या भीषण हल्ल्यात अवघ्या ४ वर्षांचा ध्रुव गोपाळ लड्डा हा चिमुकला गंभीर जखमी झाला.

भटक्या कुत्र्याने अचानक हल्ला करत बाळाला जमिनीवर पाडले व त्याच्या चेहऱ्यावर चावे घेत गंभीर जखमा केल्या. घटनेनंतर रक्तबंबाळ अवस्थेत बाळाला त्याच्या



आजोबांनी तातडीने एका खाजगी रुग्णालयात दाखल केले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच खा. विशाल पाटील यांच्या पत्नी पुजा पाटील यांनी लड्डा कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. तसेच या घटनेबाबत खा. विशाल पाटील यांच्या माध्यमातून महापालिकेकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. सांगली शहरात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून नागरिकांकडून महापालिकेने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# मनपा निवडणुकीसाठी मुख्यमंत्र्यांकडून घोषणांचा पाऊस

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिकेसह राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका येत्या १५ जानेवारी रोजी होत आहेत. या पार्श्वभूमीवर सांगली महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ करण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सांगलीत सभा झाली. अतिशय अल्प कालावधीसाठी झालेल्या या दौऱ्यात त्यांनी प्रचार सभेत सांगली शहराच्या विकासाबाबत अनेक मोठ्या घोषणा केल्या.



सांगली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगलीतूनच राज्यातील महापालिका निवडणूक प्रचाराची सुरुवात केली. सांगली शहरासाठी कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांच्या घोषणाही केल्या.

सांगलीच्या शुद्ध पाणीपुरवठ्यासाठी ४५४ कोटींच्या वारणा उद्धव योजनेला मान्यता देण्यात येणार असून, पुराचे पाणी दुष्काळी मराठवाड्याकडे वळवण्यासाठी ५९१ कोटींच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे. सांगली महापालिकेच्या सुसज्ज इमारतीसाठीही निधी दिला जाणार आहे. महापालिकेसाठी १०० कोटींचे रस्ते, १०५ कोटींची पाणी योजना, २५३ कोटींची ड्रेनेज योजना, ८९ कोटींचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, शहरातील एलईडी लाईटसाठी ६० कोटी, तसेच शंभर फूट रस्ता व काळी खण विकासासाठी १८ कोटी देण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

यावेळी विरोधकांवर टीका करताना, इतर पक्षांना ५० उमेदवारही उभे करता आले नाहीत, त्यामुळे भाजपला पूर्ण बहुमताने निवडून द्या, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. तसेच सांगलीतील विरोधक एकमेकांशी एकत्र आल्याची टीका करत, त्यांची टोळी जनतेने ओळखावी, असे मत मंत्री पाटील यांनी व्यक्त केले.

# निवडणूक आयोगाने जनाची नाही तर मनाची तरी बाळगावी : हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई : हॅलो प्रभात**

विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पदाचा गैरवापर करत केलेले वर्तन हा आदर्श आचारसंहितेचा भंगच आहे. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज नष्ट केले आहे. निवडणूक आयोग प्रामाणिक नाही हे दिसत आहे. निवडणूक आयोगाने जनाची नाही तर मनाची तरी बाळगून आतापर्यंत गुन्हा दाखल करायला हवा होता,



पण आयोग हा भाजपाच्या दावणीला बांधलेला आहे हे पुन्हा अधोरेखित होत आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले की, विधानसभा अध्यक्ष, विधान परिषदेचे सभापती, लोकसभा अध्यक्ष, राज्यसभा सभापती, राज्यपाल यांनी अराजकीय भूमिका घ्यायची असते, ते एका अत्यंत महत्वाच्या संवैधानिक पदावर असतात. पण राहुल नार्वेकर हे गुंड, मवाल्यासारखे वागले, विरोधी पक्षाच्या व्यक्तीला दमदाटी केली, त्यांची देहबोली, वर्तन व दमदाटी ही अत्यंत खालच्या पातळीवरची होती, ही शोकांतिका आहे.

# एमआयटी एडीटी विद्यापीठाला 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार

**पुणे : हॅलो प्रभात**

डिफफेन्स फोर्स लीग (डीएफएल) आणि डीआयएफटी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय स्तरावरील 'डिव्हाईन एव्हिएशन एज्युकेशन अँड कल्चर समिट'मध्ये शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टीपूर्ण व उल्लेखनीय योगदानाबद्दल एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांना डीएफएलचा प्रतिष्ठेचा 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान विद्यापीठाच्या विश्वस्त

## प्रा.डॉ.सुनिता कराड यांनी स्विकारला सन्मान



व कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड यांनी स्वीकारला.

'आपल्या सैन्याला समजावून घ्या' या संकल्पनेवर आधारित आणि 'वॉल ऑफ हिरोज' या जागतिक विक्रमी मोहिमेच्या अधिकृत शुभारंभासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन माजी हवाई दल उपप्रमुख एअर मार्शल भूषण गोखले यांच्या हस्ते झाले. यावेळी अरुणाचल प्रदेश व मिझोरामचे राज्यपाल तसेच इंडियन एअरलाइन्सचे माजी अध्यक्ष एअर मार्शल शशीकुमार रामदास यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या नेतृत्वाखाली एमआयटी-एडीटी विद्यापीठाला मिळालेला 'स्वॉर्ड ऑफ ऑनर' पुरस्कार हा विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था, सामाजिक बांधिलकी व देशहितासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा गौरव असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# रणनीती अचूक बंडोबांचे 'बंड', थंड करण्यात 'भाजप'ला यश

**सांगली : गणेश पाटील**

## अनेक प्रभागात म.वि.आ.तील घटक पक्ष आमने-सामने

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सांगली प्रचार दौरा झाला, कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करण्याचे काम वरिष्ठ नेत्यांच्या दौऱ्यानंतर होते, निवडणुकीचा अंतिम टप्पा आता सुरू झाला आहे पण सांगली महापालिका निवडणुकीत मात्र भाजपच्या चाणक्यांनी चतुर रणनीती अवलंबली , उमेदवारी न मिळाल्याने निर्माण झालेले बंड थंड करण्यात भाजपला यश आले , महापालिकेच्या विविध प्रभागांमध्ये भाजप विरोधात महाविकास आघाडीतील सर्वच घटकपक्षांनी उभे केलेले उमेदवार म्हणजे ही निवडणूक एकतर्फी करण्यात भाजपला यश आले आहे असाच याचा अर्थ आहे असे राजकीय जाणकारांमधून बोलले जात आहे.

२०१८ च्या महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे ४१ आणि मित्र पक्षांचे २ उमेदवार विजयी झाले होते. यावेळी भाजप स्वबळावर निवडणूक लढणार हे निश्चित झाल्यानंतर राजकारणाला गती आली. केंद्रात आणि राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार असल्यामुळे भाजपकडे इच्छुकांचा मोठा ओढा होता, त्यात आयारामांना मोठ्या प्रमाणावर प्रवेश दिल्यामुळे जागा वाटपाच्या वेळी भाजपात मोठी बंडखोरी होईल अशा भ्रमात महाविकास आघाडीचे नेते होते.

भाजपने स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला तरी महाविकास आघाडीने मात्र सर्वच ठिकाणी भाजप विरोधात महाविकास आघाडी अशी निवडणूक उभी केली नाही तर मैत्रीपूर्ण लढत या शब्दाचा वापर करत अनेक प्रभागांमध्ये राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, ठाकरे सेना, काँग्रेस यांनी आपले उमेदवार उतरवून भाजपचा विजयाचा मार्ग सुकर केला.

अत्यंत चतुर रणनीती वापरून भाजप ने महाविकास आघाडीत बिघाडी निर्माण केल्यामुळेच अनेक ठिकाणी महाविकास आघाडीचे उमेदवार परस्पर विरोधात दंड थोपटून उभे राहिले. मिरजेत असे प्रकार जवळपास सर्वच प्रभागांमध्ये दिसून येत




आहेत. आता महापालिका निवडणुकीच्या नाटकाचा तिसरा अंक सुरु झाला आहे. भाजपमधील बंडखोरांनी मोठ्या प्रमाणावर उमेदवारी दाखल केली , तथापि उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या काळात धूर्त रणनीतीचा वापर करत बंडखोरी करणाऱ्या उमेदवारांची समजूत काढण्यात जिल्ह्यातील भाजप नेत्यांना यश आले.

आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दौरे सुरू झाले आहेत. सांगलीतील सभेत देवेंद्र फडणवीस यांनी पदाधिकाऱ्यांना, उमेदवारांना धैर्य देण्याचे काम केले.

आता अन्य पक्षांच्या नेत्यांची दौरेदेखील सुरू होतील. निवडणुकीच्या सीझनमध्ये मतदारांच्या दारात नेते लोटांगण घालतात, पण निवडणूक पार पडली तर की पाच - पाच वर्ष नागरिकांना नेत्यांच्या दारात लोटांगण घालावे लागते , हा जो समज आहे तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूर करण्याचा प्रयत्न सांगलीत केला. राज्यात सत्तेत असलेले महायुतीचे सरकार लोकविकासाभिमुख योजना कोणत्या पद्धतीने राबवत आहे , याचा उहापोह देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणातून झाला.

आता यानंतर सर्वच पक्षांच्या नेत्यांचे दौरे सुरू होतील. महाविकास आघाडीच्या कारकिर्दीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी कोणत्या योजना राबविल्या, कोणते निर्णय घेतले याचा लेखाजोखा केवळ ठाकरे सेनेलाच नव्हे तर त्यावेळी सत्तेची मलई खाणाऱ्या सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांना द्यावा लागणार आहे.

राजकीय वातावरण तापले आहे विधानसभा निवडणुकीतील पराभवाची सल अद्याप महाविकास आघाडीतील घटक पक्षांना आहे , हे त्यांच्यातील विसवादावरून दिसून येत आहे. भारतीय जनता पक्षाने प्रारंभा पासून नियोजनबद्ध निवडणूक आखणी केल्यामुळे आता भाजपाचा मार्ग प्रशस्त झाल्यासारखी स्थिती निर्माण झालेली आहे. मिरज येथील अनेक प्रभागांमध्ये महाविकास आघाडीतील प्रत्येक घटक पक्षांनी आपले उमेदवार उभे केले आहेत. महापालिका निवडणुकीत प्रभाग ६ हा हॉटस्पॉट मतदारसंघ म्हणून ओळखला जातो.

मुस्लिम बहुल असलेल्या या प्रभागामध्ये माजी महापौर मैनुद्दीन बागवान यांची राष्ट्रवादी अजितदादा गटाकडून उमेदवारी आहे , केलेले काम आणि जनसंपर्क याचा विचार करता ही निवडणूक मैनुद्दीन बागवान यांना सोपी जाणार असे वाटत असतानाच या प्रभागात निर्माण झालेला तिढा महाविकास आघाडीतील नेत्यांकडून कसा सोडवला जाणार हाच प्रश्न निर्माण झालेला आहे.

त्याचप्रमाणे या प्रभागात ठाकरे सेना, काँग्रेस यांचीही उमेदवारी आहे . मत विभाजनाचा फायदा अर्थातच भाजपला या मतदारसंघात देखील होण्याची शक्यता शक्यता राजकीय जाणकारांमधून व्यक्त केली जात आहे. मिरजेतील प्रभाग वीसमध्ये देखील अशीच अवघड स्थिती महाविकास आघाडीतील घटक पक्षांपुढे उभी राहिलेली आहे.